# कृषि विभाग जिल्हा परिषद,अहिल्यानगर

**अनुसुचित जाती/नवबौध्द व आदिवासी शेतक-यासाठी नविन विहिर,जुनी विहीर दुरुस्ती व इतर घटकांचा लाभ**

अनुसूचित जाती/नवबौध्द शेतक-यांचे आर्थिक दृष्टया स्वावलंबी बनविण्यासाठी शासनाने अनुसुचित जाती/नवबौध्द शेतक-यांसाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना,आदिवासी शेतक-यांसाठी बिरसा मुंडा कृषि क्रांती योजना (क्षेत्रांतर्गत व क्षेत्राबाहेरील) योजना राबविण्यात येत आहे. या योजनेत अनुसुचित जाती व जमातीच्या शेतक-यांना पुढीलप्रमाणे घटकांसाठी पॅकेज स्वरुपात अथवा मागणीनुसार अनुदान देण्यात येईल.

| बाब | **अनुदान मर्यादा रुपये** | |
|---|---|---|
| | **डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना** | **बिरसा मुंडा कृषि क्रांती योजना (क्षेत्रांतर्गत व क्षेत्राबाहेरील)** |
| **नवीन सिंचन विहीर** | **4,00,000/-** | **4,00,000/-** |
| **जुनी विहीर दुरुस्ती** | **1,00,000/-** | **1,00,000/-** |
| **शेततळ्यांचे प्लॅस्टीक अस्तरीकरण** | **राष्ट्रीय फलोत्पादन अभियानाच्या प्रचलित आर्थिक मापदंड व शेततळ्याचे आकारमानानुसार परिगणित होणाऱ्या रकमेच्या किंवा प्रत्यक्ष खर्चाच्या 90% किंवा रु.2,00,000/- यापैकी जे कमी असेल ते अनुदान अनुज्ञेय राहील.** | **राष्ट्रीय फलोत्पादन अभियानाच्या प्रचलित आर्थिक मापदंड व शेततळ्याचे आकारमानानुसार परिगणित होणाऱ्या रकमेच्या किंवा प्रत्यक्ष खर्चाच्या 90% किंवा रु. 2,00,000/- यापैकी जे कमी असेल ते अनुदान अनुज्ञेय राहील.** |
| **इनवेल बोअरींग** | **40,000/- मर्यादेत** | **40,000/- मर्यादेत** |
| **वीज जोडणी आकार** | **20,000/- (किंवा प्रत्यक्ष भरलेला आकार यापैकी जे कमी असेल ते अनुदान अनुज्ञेय राहील.)** | **20,000/- (किंवा प्रत्यक्ष भरलेला आकार यापैकी जे कमी असेल ते अनुदान अनुज्ञेय राहील.)** |
| **पंपसंच(डिझेल/विद्युत)** | **10 अश्वशक्ती क्षमतेपर्यंत पंपसंचकरिता प्रचलित आर्थिक मापदंडाच्या किंवा प्रत्यक्ष होणाऱ्या खर्चाच्या 90% किंवा रू. 40,000/- यापैकी जे कमी असेल ते अनुदान अनुज्ञेय राहील.** | **10 अश्वशक्ती क्षमतेपर्यंत पंपसंचकरिता प्रचलित आर्थिक मापदंडाच्या किंवा प्रत्यक्ष होणाऱ्या खर्चाच्या 90% किंवा रू. 40,000/- यापैकी जे कमी असेल ते अनुदान अनुज्ञेय राहील.** |
| **सोलार पंप (वीज जोडणी आकार व पंप संच ऐवजी)** | **प्रचलित आर्थिक मापदंडाच्या किंवा प्रत्यक्ष होणाऱ्या खर्चाच्या 90% किंवा रू. 50,000/- यापैकी जे कमी असेल ते अनुदान अनुज्ञेय राहील.** | **प्रचलित आर्थिक मापदंडाच्या किंवा प्रत्यक्ष होणाऱ्या खर्चाच्या 90% किंवा रू. 50,000/- यापैकी जे कमी असेल ते अनुदान अनुज्ञेय राहील.** |
| **एचडीपीई/पीव्हीसी पाईप** | **अन्न आणि पोषण सुरक्षा अन्नधान्य पिके या। योजनेंतर्गत प्रती मीटर करिता प्रचलित आर्थिक मापदंडाच्या किंवा प्रत्यक्ष होणाऱ्या खर्चाच्या १००% किंवा रू. 50,000/- यापैकी जे कमी असेल ते अनुदान अनुज्ञेय राहील.** | **अन्न आणि पोषण सुरक्षा अन्नधान्य पिके या। योजनेंतर्गत प्रती मीटर करिता प्रचलित आर्थिक मापदंडाच्या किंवा प्रत्यक्ष होणाऱ्या खर्चाच्या १००% किंवा रू. 50,000/- यापैकी जे कमी असेल ते अनुदान अनुज्ञेय राहील.** |
| **तुषार सिंचन संच (पुरक अनुदान)** | **राज्यशासनाकडुन 55% अनुदान प्राप्त असलेल्या लाभार्थीना उर्वरीत 35% रक्कम किंवा रू. ४७,०००/- यापैकी जे कमी असेल ते पुरक अनुदान अनुज्ञेय राहील.** | **राज्यशासनाकडुन 45% अनुदान प्राप्त असलेल्या लाभार्थीना उर्वरीत 45% रक्कम किंवा रू. ४७,०००/- यापैकी जे कमी असेल ते पुरक अनुदान अनुज्ञेय राहील.** |
| **ठिबक सिंचन संच (पुरक अनुदान)** | **राज्यशासनाकडुन 55% अनुदान प्राप्त असलेल्या लाभार्थीना उर्वरीत 35% रक्कम किंवा रू. ९७,०००/- यापैकी जे कमी असेल ते अनुदान अनुज्ञेय राहील.** | **राज्यशासनाकडुन 45% अनुदान प्राप्त असलेल्या लाभार्थीना उर्वरीत 45% रक्कम किंवा रू. ९७,०००/- यापैकी जे कमी असेल ते अनुदान अनुज्ञेय राहील.** |
| **यंत्रसामुग्री (बैलचलित/ट्रॅक्टरचलित अवजारे) (नवीन बाब)** | **50,000/-** | **50,000/-** |
| **परसबाग** | **5,000/-** | **5,000/-** |
| **विंधन विहीर (नवीन बाब)** | **---------** | **50,000/- किंवा प्रत्यक्ष खर्च यापैकी जे कमी असेल ते अनुदान अनुज्ञेय राहील.**<br>**(फक्त वनक्षेत्रातील आदिवासी शेतक-यांना)** |

**(मागील पानांवर)**

# लाभार्थी पात्रतेचे निकष

१. लाभार्थी अनुसूचित जमाती प्रवर्गातील शेतकरी असणे बंधनकारक राहील.

2. शेतकऱ्याकडे सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जात प्रमाणपत्र असणे आवश्यक राहील.

3. शेतकऱ्याच्या नावे जमीनधारणेचा ७/१२ दाखला व ८अ उतारा असणे आवश्यक आहे.
(नगर पंचायत, नगरपालीका व महानगर पालिका क्षेत्राबाहेरील (संदर्भ शासन पत्र क्र.संकीर्ण-2017/प्र.क्र.142/3अ,दि.24 एप्रिल 2018)

4. लाभार्थ्यांचे स्वतःचे बँक खाते असणे व सदर बँक खाते आधारकार्डशी संलग्न असणे आवश्यक आहे.

5. दारीद्रय रेषेखालील तसेच महिला व अपंग लाभार्थ्यास प्रथम प्राधान्य राहील.

6. सदर योजनेच्या लाभार्थ्यांसाठी लागू असलेली रु.१,५०,०००/- वार्षिक उत्पन्न मर्यादेची अट रद्द करण्यात आलेली आहे.

7. योजनेतील नमुद घटकांचा लाभ घेणेकामी शेतकऱ्याकडे किमान ०.४० हेक्टर व कमाल ६ हेक्टर एवढी शेत जमीन असणे आवश्यक असेल. मात्र, शेतक-यांच्या जमीनी दुर्गम भागात व विखंडीत असल्यास ०.४० हे. पेक्षा कमी जमीन धारणा असलेले दोन किंवा अधिक लाभार्थी एकत्र आल्यास त्यांची एकत्रित जमीन किमान ०.४० हे. इतकी होत असल्यास त्यांनी करार लिहून दिल्यास त्यांना योजनेचा लाभ अनुज्ञेय राहील. त्याचप्रमाणे दारिद्रय रेषेखालील लाभार्थ्यांना कमाल ६.० हे. धारणक्षेत्राची अट लागू असणार नाही.

8. एकदा संबंधित योजनेचा पूर्ण लाभ घेतल्यास पुढील पाच वर्ष त्याच लाभार्थ्यास किंवा कुटूंबास या योजनेचा लाभ देय होणार नाही. नवीन विहीर या घटकाचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यास २० वर्षानंतर जुनी विहीर दुरुस्ती या घटकाचा लाभ अनुज्ञेय राहील.

9. अशाच स्वरुपाच्या कृषी विषयक विकास योजनेकरता आदिवासी उपयोजनेतून तसेच केंद्र शासनाच्या SCA व घटनेच्या कलम २७५ (A) अंतर्गत उपलब्ध करुन दिलेल्या निधीतून राबविण्यात येणाऱ्या योजनेतून लाभ दिला असल्यास या योजनेंतर्गत देण्यात येणारा लाभ अनुज्ञेय असणार नाही.

10.सदर योजनेचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांच्या ७/१२ उत्ताऱ्यावर त्याबाबतची नोंद घेण्यात येईल.

योजनेत सहभागी होण्यासाठी https://mahadbt.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज भरावा, लाभार्थी निवड सोडत प्रक्रियेव्दारे ऑनलाईन करणेत येईल. अधिक माहितीसाठी पंचायत समितीचे गट विकास अधिकारी किंवा कृषि अधिकारी यांच्याशी संपर्क करावा.